DECEMBER 2023 DBJ NEWSLETTER VOL. 1, ISSUE 3

DBJ NEWSLETTER

A Monthly Newsletter of D.B.J. College, Chiplun Dist. Ratnagiri (M.S.)



IN THIS ISSUE

CONSTITUTION DAY
BOOK EXHIBITION
BOOKS DONATION
AVISHKAR RESEARCH FESTIVAL
RATNAGIRI EDUCATION CONFERENCE
CAREER & PLACEMENT
N.S.S. CAMP
SPORTS ACTIVITIES
DEPT. OF ACCOUNTANCY

EDITOR'S MESSAGE

Welcome to the third issue of the D.B.J. Newsletter. As we navigate the semester's midpoint, we want to take a moment to acknowledge the transforming energy that vibrates within our college community.

We are doing tremendous activities for the benefit of our students, institute and our society.

During the month, we have successfully organised the Ratnagiri Education Conference, Avishkar Research Festival and N.S.S. Camp.

Book Exhibitions, Career counselling, Quiz Competitions and, Sports achievements are our regular activities which have been conducted in this month also.

We also congratulate the senior and junior college faculty members who have shown their interest in donating the books to the Dr. Babasaheb Ambedkar Public Library, Chiplun.

We extend our sincere gratitude to all the readers who always support and encourage us.

Team DBJ Newsletter

ग्रंथालय विभाग

डीबीजेच्या ग्रंथालयात संविधान दिवस उत्साहात साजरा

ग्रंथालयात दि. २६ नोव्हेंबर २०२३ रोजी 'भारतीय संविधान दिवस' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्रबंधक श्री. अनिल कलकुटकी, ग्रंथपाल डॉ. एस.पी. मोरे, श्री. अरविंद तांदळे तसेच ग्रंथालय आणि माहितीशास्त्र पदवी विषयाचे विद्यार्थी उपस्थित होते.

प्रथम प्रबंधक श्री. अनिल कलकुटकी यांच्या हस्ते संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. नंतर संविधानाच्या प्रस्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. यावेळी संविधानाच्या अनेक प्रती तसेच बाबासाहेबांचे संविधान सभेतील डिबेट्स या ग्रंथाच्या प्रतींचे प्रदर्शन भरवण्यात आले.

प्रस्तावनेपर मनोगतात बोलताना ग्रंथपाल डॉ. एस.पी. मोरे यांनी संविधानाची संकल्पना, निर्मिती, आणि बाबासाहेबांचे त्यातील महत्वाचे योगदान यावर आपले मत मांडले. संविधानाचे आजच्या काळात महत्व आणि आपले कर्तव्ये यावरही त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी 26/11 मुंबई आतंकवादी हल्ल्यात शहीद झालेल्या वीर जवानांना आणि निष्पाप नागरिकांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली वाहण्यात आली.





ग्रंथालय विभाग



दोन दिवसीय ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन

डी.बी.जे. महाविद्यालयातील ग्रंथालय विभागामार्फत युवा महोत्सवानिमित्त दि. ७ आणि ८ डिसेंबर २०२३ रोजी ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या प्रदर्शनात ग्रंथालयातील निवडक संदर्भग्रंथांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. यामध्ये विश्वकोश, चरित्रे, मराठी, हिंदी, इंग्रजी साहित्यातील विविध प्रकार, प्रवासवर्णने, विविध शास्त्रे, सामाजिक शास्त्रे, खेळ, स्पर्धा परीक्षा आणि व्यक्तिमत्व विकास आदी विषयांवरील शेकडो ग्रंथ प्रदर्शनात ठेवण्यात आले होते.

प्रदर्शनाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव बापट यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. बापट सरांनी विद्यार्थ्यांना ग्रंथ वाचनाचे महत्व विशद केले. मनोरंजनाची विविध साधने आली तसेच ती कालांतराने नामशेष देखील झाली, परंतु ग्रंथ हे ज्ञान मिळविण्याचे व मनोरंजनाचे असे साधन आहे जे कधीही नामशेष होणार नाही, असे उद्गार डॉ. बापट यांनी काढले.

यावेळी ग्रंथालय समिती संयोजक डॉ. चेतन आठवले, प्रा. व्ही.पी. जाधव, प्रा. एम.के. रामटेके, प्रा. एस्. आर. भादुले आणि विद्यार्थी वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होता. याप्रसंगी पालघर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.ए. राजपूत यांनी दिलेले देणगी ग्रंथ ग्रंथपालांकडे सुपूर्द करण्यात आले.









डी.बी. जे. महाविद्यालयातील प्राध्यापकांकडून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक वाचनालयाला ग्रंथभेट



आंबेडकर वाचनालयात महापरिनिर्वाण दिन

प्राचार्य बापट यांचे स्वागत करताना पदाधिकारी

चिपळूण: भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालय बुरुमातळी, चिपळूण येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांना अभिवादन करण्याचा कार्यक्रम करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डीबीजे महाविद्यालयाचे प्राचार्य माधव बापट हे उपस्थित होते. डीबीजेचे ग्रंथपाल डॉ. सुभाष मोरे हेही उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेचे कोषाध्यक्ष श्री. अमित ओक यांनी केले. प्राचार्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी वाचनालयाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित ग्रंथ भेट म्हणून दिले. या कार्यक्रमाला संस्थेचे सर्व संचालक उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष सुनील खेडेकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या वाचनालयात डॉ. आंबेडकर यांच्यावरील ग्रंथ व चरित्र पुस्तकांचे ग्रंथ प्रदर्शन रविवारपर्यंत मांडण्यात आले आहे. त्याचा वाचकांनी लाभ घ्यावा. या कार्यक्रमाला सभासद व वाचक वर्गदेखिल उपस्थित होता. वाचनालयाच्या ग्रंथपाल सौ. तेजश्री सोमण यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

शहरातील बुरूमतळी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक वाचनालयाला बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणदिनानिमित्त महाविद्यालयातील प्राध्यापकांकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे काही महत्वपूर्ण ग्रंथ भेट म्हणून देण्यात आले. हे सर्व ग्रंथ महाविद्यालयातील डॉ. शिल्पा सप्रे-भारमल, डॉ. बी.एस. कांबळे, डॉ. एस.पी. मोरे, प्रा. ए .वाय. पुनवतकर, प्रा. एस.व्ही. दांडेकर आणि इतर प्राध्यापकांनी भेट म्हणून दिले आहेत.

सदर ग्रंथभेट दि. ६ डिसेंबर २०२३ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालयात आयोजित कार्यक्रमात प्राचार्य डॉ. माधव बापट आणि ग्रंथपाल डॉ. सुधीर मोरे यांच्या उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालयाचे सर्व संचालक मंडळाकडे देण्यात आली.





डी.बी.जे. महाविद्यालयात आविष्कार रिसर्च स्पर्धेचे आयोजन

डी.बी.जे. महाविद्यालयात दि. ३० नोव्हें. २०२३ रोजी वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी आविष्कार रिसर्च स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी आविष्कार रिसर्च प्रमुख डॉ.बी.एस. कांबळे यांनी प्रास्ताविक करून स्पर्धेचे महत्व सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उप-प्राचार्य डॉ. एम. एस. चांदा होते. भारतामध्ये रिसर्चचे महत्व काय आहे व आविष्कारची सुरुवात कधी झाली यांसंदर्भात डॉ. चांदा यांनी मनोगत व्यक्त केले. पोस्टर प्रेझेंटेशनचे उद्घाटन डॉ. चांदा यांचे हस्ते झाले. यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. एन.एस. तळप, पर्यवेक्षिका प्रा. एस.एस. कुलकर्णी उपस्थित होत्या.

या स्पर्धेमध्ये एकूण 29 प्रोजेक्ट व 57 विद्यार्थी सहभागी झाले होते. सहभागी विद्यार्थ्यांपैकी एकुण तीन विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आले. सदर स्पर्धेचे परिक्षक म्हणून प्रा. एस.के. जाधव, प्रा. आर.के. दवणे, डॉ. एच. टी. बाबर, प्रा. एस.आर. भादुले , डॉ. आर.पी. खवणेकर, प्रा. एस.एस. कुलकर्णी प्रा. इंगळे, प्रा. सावरे यांनी काम पाहीले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. बी. एस. कांबळे यांच्या नेतृत्वात प्रा. चेतन खांडेकर, प्रा. ओंकार देशमुख, प्रा. पूजा शिंदे, प्रा. मोहोळकर, प्रा. प्रांजल लकेश्री , प्रा. बिरादार, प्रा. सोनाली खर्चे, प्रा. एस.आर. इंगळे, प्रा. अरुण जाधव, प्रा. सदफ चिकटे, प्रा. पी.बी. शिगवण, प्रा. जगताप व प्रा. साडविलकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

आविष्कार रिसर्च स्पर्धेतील काही क्षण













Ratnagiri Education Conference-2023

रत्नागिरी जिल्हा शिक्षण परिषद - २०२३



उद्घाटक मा.मंगेशजी तांबे

(चेअरमन, न.ए.सोसायटी, चिपळूण)



• प्रमुख मार्गदर्शक •

डॉ.आर.बी.सिंह
अध्यक्ष
अशासकीय महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी संघ

डॉ.गुलाबराव राजे
अध्यक्ष - बुक्टू

डॉ.तपती मुखोपाध्याय
(माजी अध्यक्ष)
महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ

सर्व सहभागी संघटनांचे प्रतिनिधी

सोमवार दि.०४ डिसेंबर २०२३ वेळ : दुपारी २ ते ५

• सहभागी संघटना •

- बुक्टू प्राध्यापक संघटना
- अशासकीय महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी संघ
- चिपळूण एज्युकेशन सोसायटी
- शिक्षक भरती
- रत्नागिरी जिल्हा माध्यमिक अध्यापक संघ
- रत्नागिरी जिल्हा कनिष्ठ महा.शिक्षक संघटना
- कास्ट्राईब शिक्षक संघटना
- महाराष्ट्र राज्य पुरोगामी शिक्षक समिती
- महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ, रत्नागिरी
- अंगणवाडी कर्मचारी सभा, ता.गुहागर
- महाराष्ट्र राज्य केंद्र प्रमुख संघ, रत्नागिरी
- महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद, रत्नागिरी
- चिपळूण तालुका मुख्याध्यापक संघ
- प्रोटॉन शिक्षक संघटना
- रत्नागिरी जिल्हा पालक संघ
- ऑर्गनायझेशन फॉर राईट्स ऑफ ट्रायबल, रत्नागिरी (OFROT)

Ratnagiri Education Conference-2023

Some moments..

















राष्ट्रीय सेवा योजना (वरिष्ठ महाविद्यालय)

ग्रामीण पुनर्रचना निवासी शिबीर -२०२३-२४

कार्यक्रम पत्रिका

दिनचर्या

सकाळी	६.०० ते ७.३० प्रार्थना, व्यायाम, योगासने
	७.३० ते ८.०० अल्पोपहार
	८.०० ते १.०० श्रमसंस्कार
दुपारी	२.०० ते ३.०० दुपारचे भोजन
	३.०० ते ७.०० व्याख्याने व उपक्रम
सायंकाळी	७.०० ते ८.०० उपक्रम व पथनाट्य सादरीकरण
	८.०० ते ९.०० रात्रीचे जेवण
	९.०० ते १०.०० स्पर्धा व सांस्कृतिक उपक्रम

विशेष उपक्रम

- जलसाक्षरता
- पर्यावरण जागृती
- आपत्ती व्यवस्थापन
- बंधारा दुरुस्ती
- अंधश्रद्धा निर्मूलन
- रस्ते तयार करणे

एसटी वेळापत्रक

चिपळूण-गुहागर या मार्गाच्या सर्व बस नॅशनल इंग्लिश मिडियम स्कूल, मिरजोळी या बस स्टॉप वर थांबतात.

शिबिराकडे येण्याचा मार्ग



स्वागतोत्सुक

सर्व ग्रामस्थ, ग्रामपंचायत मिरजोळी
राष्ट्रीय सेवा योजना
डी. बी. जे. महाविद्यालय, चिपळूण

उद्घाटन

मंगळवार, दि. ०५ डिसेंबर २०२३
दुपारी ३.०० वा.

उद्घाटक

मा. श्री. मंगेशजी तांबे (चेअरमन, न. ए. सोसायटी)
मा. प्राचार्य डॉ. एम. एस. बापट (डी.बी.जे. कॉलेज, चिपळूण)

प्रमुख उपस्थिती

मा. ॲड. श्री. जीवन रेळेकर
(व्हा. चेअरमन, न. ए. सोसायटी)
मा. श्री. गणेश निवाते
(उपसरपंच, मिरजोळी)
सर्व ग्रामपंचायत सदस्य

समारोप

सोमवार, दि. ११ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी ११ वा.
मा.श्री. प्रशांत यादव
अध्यक्ष, वाशिष्ठी मिल्क ॲण्ड मिल्क प्रोडक्टस् प्रा. लि. चिपळूण
मा.सौ. स्वप्ना यादव
मुख्य कार्यकारी अधिकारी, चिपळूण नागरी सहकारी पतसंस्था लि. चिपळूण आणि
मुख्य प्रवर्तक, वाशिष्ठी मिल्क ॲण्ड मिल्क प्रोडक्टस् प्रा. लि. चिपळूण
न. ए. सोसायटी चेअरमन, नियामक समिती सदस्य व पदाधिकारी, प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी

सदिच्छा भेट

- मा. भास्कर जाधव (आमदार)
- मा. शेखर निकम (आमदार)
- मा. प्रांताधिकारी (चिपळूण)
- मा. तहसीलदार (चिपळूण)
- मा. गटविकास अधिकारी (चिपळूण)
- मा. डॉ. सुधीर पुराणिक (समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना विभाग मुंबई विद्यापीठ)
- डॉ. सुशील शिंदे (ओ.एस.डी.,राष्ट्रीय सेवा योजना विभाग)
- न. ए. सोसायटी पदाधिकारी, चेअरमन व नियामक समिती सदस्य

नवकोकण एज्युकेशन सोसायटीचे

डी. बी. जे (वरिष्ठ) महाविद्यालय,

चिपळूण, जिल्हा – रत्नागिरी
नॅक चतुर्थ नामांकन : 'अ श्रेणी' (CGPA 3.14)
ISO नामांकन प्राप्त 9001:2015
(मुंबई विद्यापीठ उत्कृष्ठ महाविद्यालय पुरस्कार प्राप्त)

राष्ट्रीय सेवा योजना
मेरी माटी, मेरा देश अभियान : २०२३
ग्रामीण पुनर्रचना निवासी शिबीर
२०२३-२४

NOT ME BUT YOU

सस्नेह निमंत्रण
आणि
कार्यक्रम पत्रिका

शिबीर कालावधी

मंगळवार, ५ डिसेंबर २०२३ ते सोमवार, ११ डिसेंबर २०२३

शिबीर स्थळ

पू. प्रा. मराठी शाळा, मिरजोळी
ता. चिपळूण, जि. रत्नागिरी

निमंत्रण

मा.
सस्नेह नमस्कार

चिपळूण गावातील दूरदर्शी शिक्षणप्रेमींनी एकत्र येऊन ५४ वर्षांपूर्वी लावलेले इवलेसे रोप एका विशाल वटवृक्षात रूपांतरीत झाले आहे. कोकणातील अविकसित व दुर्बल घटकांना उच्चशिक्षण आणि आधुनिक तंत्रज्ञानात पारंगत करून कोकणच्या विकासात मोलाचे योगदान देत महाविद्यालयाची सुवर्णोत्तर वाटचाल सुरू आहे. या यशस्वी वाटचालीत युवकांचे ग्रामीण विकासातील योगदान वाढविण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणणे व सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे या उद्देशाने २४ सप्टेंबर १९६९ रोजी म्हणजे महात्मा गांधीजींच्या जन्मशताब्दी वर्षापासून राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना झाली. राष्ट्रीय सेवा योजना भारत सरकारच्या युवा कल्याण आणि क्रिडा मंत्रालयांतर्गत राबविण्यात येते. विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबन, चारित्र्यवर्धन आणि सामाजिक बांधिलकी या मुल्यांची रूजवणूक व्हावी, युवकांनी देशवासीयांच्या सेवेसाठी काही रचनात्मक कार्य करावे या हेतूने सी. डी. देशमुख, प्रा. के. जी. सय्यदीन, डॉ. दौलतसिंह कोठारी, डॉ. व्ही. के. आर, व्ही. राव, डॉ. शाह, डॉ. एस. के हूलबे, डॉ. थॉमस बर्नाबास आदी ज्ञात-अज्ञात समाजसेवक यांचे योगदान लाभले.

महात्मा गांधीजींच्या विचारांना राबविण्यासाठी, पंडीत जवाहरलाल नेहरू यांचे स्वप्न साकारण्यासाठी देशातील १८० विद्यापिठातील आठ हजार महाविद्यालयातील आतापर्यंत साधारण ३२ लाखांहून अधिक विद्यार्थी या योजनेत सहभागी झाले आहेत. या अथांग आकाशातील एक अंश म्हणजे डी.बी.जे. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग होय. या योजनेचा एक भाग म्हणून मिरजोळी येथे ०७ दिवसांचे विशेष श्रमसंस्कार शिबीर आयोजित करीत आहोत. जलसंधारण, आरोग्य तपासणी, आपत्ती व्यवस्थापन, ग्रामस्वच्छता, विद्यार्थी व्यक्तिमत्व विकास, पर्यावरण रक्षण इ. अनेक विविध कार्यक्रम या शिबिरात राबविले जाणार आहेत.

हे शिबीर यशस्वी होण्यासाठी आपल्या मौलिक सूचना, मार्गदर्शन व शुभेच्छा आमच्या विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ठरतील. त्यासाठी हे आग्रहाचे निमंत्रण

आपले विनित

प्रा. डॉ. यु. डी. सुर्यवंशी, कार्यक्रमाधिकारी
प्रा. डॉ. एम. एस. चांदा, उपप्राचार्य
डॉ. एम. एस. बापट, प्राचार्य
प्रा. सौ. ए. व्ही. कांबळी - घोले
प्रा. एस. एस. शिंदे, सह कार्यक्रमाधिकारी
प्रा. डॉ. राहुल मराठे, जिल्हा समन्वयक
प्रा. डॉ. युवराज पाटील, विभागीय समन्वयक
श्री. अनिल कलकुटकी, रजिस्ट्रार

सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी
डी. बी. जे. महाविद्यालय, चिपळूण

स्थानिक संयोजक समिती

श्री. गणेश सुरेश निवाते	-	उपसरपंच
श्री. सियाकत उमर दलवाई	-	सदस्य न.ए.सोसायटी व नॅशनल इंग्लिश स्कूल
सौ. दिशा अनंत निवाते	-	अध्यक्षा शाळा व्यवस्थापन समिती
सौ. मनश्री महेश सुर्वे	-	उपाध्यक्षा शाळा व्यवस्थापन समिती
श्री. कासम नुरमहंमद दलवाई	-	मा. सरपंच व सदस्य ग्रा.पं.
श्री. विनोद तुकाराम पवार	-	सदस्य ग्रा.पं.
श्री. संदिप काशिनाथ जाधव	-	सदस्य
सौ. मुमताज अदिब दलवाई	-	सदस्य
सौ. माधुरी मिलिंद सकपाळ	-	सदस्य
सौ. वृषाली राजेश कदम	-	सदस्य
सौ. प्रिती अनंत पैरवकर	-	सदस्य
कु. रूचिता रविंद्र पवार	-	सदस्य
सौ. माधवी विनय चितळे	-	मुख्याध्यापिका पू. प्रा. मराठी शाळा मिरजोळी
सौ. शबनम जफर फरीदी	-	मुख्याध्यापिका नॅशनल इंग्लिश मिडीयम स्कूल
श्री. रोहित तुकाराम जाधव	-	मुख्याध्यापक दलवाई हायस्कूल मिरजोळी
सौ. आकांक्षा राष्ट्रपाल सावंत	-	शिक्षिका पू. प्रा. मराठी शाळा
सौ. नंदिनी प्रशांत पवार	-	पोलिस पाटील
श्री. अनिल रामचंद्र माळी	-	तंटामुक्ती अध्यक्ष
श्री. सुभाष बारकू माळी	-	ग्रामसेवक मिरजोळी
श्री. नितीन पुरी	-	तलाठी मिरजोळी
श्री. राजेश चंद्रकांत जाधव	-	पत्रकार- तरूण भारत
श्री. मिलींद भालचंद्र सकपाळ	-	पत्रकार-प्रहार

महाविद्यालयीन संयोजन समिती

प्रा. जी. के. ब्रह्मे	प्रा. एस. व्ही. भाटवडेकर	प्रा. ए. ए. नाईक
प्रा. पी. ए. डिंगणकर	प्रा. ए. व्ही. जोशी	प्रा. एस. आर. कुंदरगी
प्रा. एस. एस. गोखले	प्रा. डॉ. आर. बी. झोरे	प्रा. पी. जे. पिसे
प्रा. एन. पी. जोशी	प्रा. पी. आर. लकेश्री	प्रा. एस. एम. पावणे

विद्यार्थी प्रतिनिधी

कु. माहिन मुल्ला
कु. प्रणव साळवी

॥ पर्यावरण संतुलनाचं ठेवूया भान
वृक्षसंवर्धन नटवू वसुंधरा छान ॥

व्याख्याने व उपक्रम

दिनांक व वेळ	व्याख्यान	उपक्रम	कामाचे स्वरूप
	दु. ३.०० ते ५.००	सायं. ५.३० ते ७.००	
मंगळवार दि. ५ डिसेंबर २०२३	उद्घाटन	निवास परिसर स्वच्छता	-
बुधवार दि ६ डिसेंबर २०२३	विषय: ''योगा प्रशिक्षण'' सौ. शालिनी कवडे	सर्व मानवाचा मित्र प्रा. डॉ. हरिदास बाबर	महालक्ष्मी मंदीर स्वच्छता
गुरुवार दि. ७ डिसेंबर २०२३	विषय: ''अभिनय कार्यशाळा'' प्रा. डॉ. आनंद आंबेकर	न्यूनतमवाद : जगण्याची नवीन पध्दत प्रा. डॉ. ऋचा खवणेकर	दलवाडी रस्ता / भोरजेवाडी रस्ता स्वच्छता
शुक्रवार दि. ८ डिसेंबर २०२३	विषय: पक्षी निरिक्षण श्री निलेश बापट	संमोहन कार्यक्रम प्रा. अनिल पुनवतकर	बौध्दवाडी स्मशानभुमी स्वच्छता
शनिवार दि. ९ डिसेंबर २०२३	विषय: प्रथमोपचार प्रशिक्षण डॉ. शुभम कुशे	एन. एस. एस. एक सामाजिक चळवळ प्रा. डॉ. सम्राट माने	खोरीवाडी पुलाजवळ बंधारा बांधणे
रविवार दि. १० डिसेंबर २०२३	विषय: अंधश्रध्दा निर्मुलन श्री. सचिन मोहिते	दैनंदिन जीवनाचे शास्त्रोक्त मुलमंत्र प्रा. उदय वामणे	मोहल्ला रस्ता स्वच्छता फैसलवान येथे स्वच्छता
सोमवार दि. ११ डिसेंबर २०२३	सांगता समारंभ	-	-

थेंब थेंब वाचवा पाण्याचा,
हाच मार्ग आहे सुखी भविष्याचा

SPORTS



मुंबई विद्यापीठ अंतर्गत दिनांक 09 व 10 डिसेंबर 2023 रोजी झालेल्या इंटर झोनल (21 km) हाफ मॅरेथॉन स्पर्धेत आपल्या महाविद्यालयातील कु. ओमकार चांदिवडे याने ब्रॉंझ मेडल प्राप्त केले.

Career Guidance & Placement Cell



आजचे युग हे माहिती व तंत्रज्ञानाचे युग असुन विद्यार्थ्यांनी नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करायला हवे, असे मत करिअर कट्टा रत्नागिरी जिल्हा समन्वयक तथा डी.बी.जे. महाविद्यालयाचे विभाग प्रमुख प्रा. सुनिल भादुले यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणाऱ्या "करिअर कट्टा" या उपक्रमांतर्गत दि. 06 डिसेंबर, 2023 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त घेण्यात येणाऱ्या 'Digital Productivity' या विश्वविक्रमी उपक्रमाकरता अभियान राबविण्यात आले.

महाविद्यालयातील 300 विद्यार्थ्यांनी यावेळी या उपक्रमात सहभाग नोंदविला. महाविद्यालयीन समन्वयक प्रा. श्रीनिवास गोखले यांनी सर्वांचे स्वागत केले व उपक्रमास शुभेच्छा दिल्या.

Department of Accountancy



9-12-2023

Department of Accountaancy organised inter College Business Quiz Competition for 11th and 12th Commerce Students, which received a huge response with participation of total 19 Teams from 8 Junior colleges.